# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक २५६९६०६१
२५६९००६२,
२५६९६०६४
२५६९००६५

गणेशखिंड, पुणे ४११००७

टेलिग्राम 'युनिपुना'
टेलेक्स: १४५७७१९ युनिप इन्
फॅक्स : ०२०– २५६०११५४

संदर्भ क्र. विकमं/२०११–१२/३०८ दिनांक : ०४/१०/२०११

स्मरणपत्र क्र. १

प्रति,

**मा. प्राचार्य/संचालक,**

पुणे विद्यापीठ संलग्न सर्व महाविद्यालये व
मान्यताप्राप्त संस्था.

**विषय :– इंद्रधनुष्य–२०११ युवक महोत्सवासाठी विद्यार्थ्यांची माहिती पाठविणेबाबत....**

**संदर्भ :– विकमं/२०११–१२/२०५**

महोदय/महोदया,

मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे आदेशान्वये आंतरविद्यापीठीय इंद्रधनुष्य–२०११ युवक महोत्सव महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे दिनांक ०५ ते ०९ नोव्हेंबर, २०११ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे.

सदर युवक महोत्सवासाठी पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्याकरिता ४० विद्यार्थ्यांचा संघ विविध कला प्रकारांनुसार निवडावयाचा आहे. तरी आपण आपल्या महाविद्यालयातील सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये सहभागी होऊन उल्लेखनीय कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांची माहिती विहीत नमुन्यात दि. ३० सप्टेंबर, २०११ पर्यत मागविलेली होती. आपणांस विनंती की, सदरची माहिती विहीत नमुन्यात दि. १५ ऑक्टोबर, २०११ पर्यत विद्यार्थी कल्याण मंडळ कार्यालयास पोहोचेल अशा बेताने स्वहस्ते अगर स्पीड पोस्टने पाठविण्यात यावी. यासाठी विद्यार्थी कल्याण मंडळ "विविध योजना: मार्गदर्शिकेतील" अनुक्रमणिकेमधील अ. क्र. १४ 'युवक महोत्सव' या शिर्षकातील पान क्र. ४१ ते ४८ मधील माहितीचे अवलोकन करावे.

कळावे,

संचालकांकरिता,
विद्यार्थी कल्याण मंडळ